MHAH160012012022

## निशाणी ५ खालील आदेश

अर्जदाराने प्रस्तुत मुळ अर्ज सामनेवालांविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलाचे संरक्षण अधिनियम २००५ प्रमाणे दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्ज निशाणी ५ हा अर्जदाराने तिला अंतरिम पोटगी मिळावी याकरिता न्यायप्रविष्ठ केला असून अर्जाकामी सामनेवाला यांचे म्हणणे मागविले. सामनेवाला क्र. १ यांनी अर्ज निशाणी ५ ला त्यांचे म्हणणे निशाणी २० वर दाखल केलेले आहे. अर्जदाराकडून विधिज्ञ श्री. एस. जे. नेहे आणि सामनेवालातर्फे विधिज्ञ श्री. ए. के. धुमाळ यांचा युक्तिवाद ऐकला.

२. अर्ज अंतरिम पोटगीकरिताचा आहे. प्रस्तुत अर्ज निकाली काढण्याकरिता अर्ज आणि अर्जावरील म्हणणे पाहता खालील प्रश्न उपस्थित होतात. सदर प्रश्न आणि त्यांवरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही सामनेवाला क्र. १ कडून मागणीप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास किती ? | अंशतः होय.<br>अर्जदार दरमहा रक्कम रुपये ३,०००/- अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत. |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

**<u>प्रश्न क्रमांक १ करिता</u>**.

३. अर्जदाराने प्रस्तुत मुळ अर्ज सामनेवालाविरुध्द कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलाचे संरक्षण अधिनियम २००५ प्रमाणे दाखल केलेला आहे. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार आणि सामनेवाला क्र. १ हे पती-पत्नी आहेत. सामनेवाला याने अर्जदाराचा कोणत्याही वैध कारणाशिवाय त्याग केला असून ती सदयस्थितीत माहेरी आश्रीत म्हणून राहत आहे. यादरम्यान सामनेवाला यांनी अर्जदाराला कोणतीही अन्नवस्त्राची रक्कम दिलेली नाही. सामनेवालाने अर्जदाराचा त्याग केला आहे. अर्जदार स्वतःचा चरितार्थ चालविण्यास असमर्थ आहे. तिला कोणताही कामधंदा नाही. तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याउलट सामनेवाला नं. १ याची आर्थिक परिस्थिती अत्यंत चांगली असुन त्यांची एकत्र कुटूंबाची मौजे

वडगाव पान, ता. संगमनेर, जि. अहमदनगर येथे ३ ते ४ एकर बागायत शेतजमिन आहे. त्यापासुन वर्षाकाठी रक्कम रुपये ४ ते ५ लाख रुपये मिळतात. तसेच सामनेवाला नं. १ याचे स्वतःचे श्री. स्वामी समर्थ इलेक्ट्रीक शॉप असुन त्यास ३० ते ३५ हजार रुपये दरमहा पगार मिळतो. सामनेवाला नं. १ यांच्यावर अर्जदारांशिवाय कोणीही अवलंबुन नाही. सामनेवाला याने अर्जदाराचा त्याग केलेपासुन तिच्या अन्नवस्त्राची कोणतीही तरतुद केलेली नाही. सामनेवाला हे आर्थिकदृष्टया संपन्न असून अर्जदाराला पोटगी देण्यास सक्षम आहे. सामनेवाला याने कायदेशीर व नैतिक जबाबदारी जाणूनबुजून टाळली आहे. अर्जाचा निकाल होण्यास अदयाप अवधी आहे. दरम्यान अर्जदाराची उपासमार होत आहे. सबब सामनेवालाकडून अर्जाचा निकाल होईपावेतो अर्ज दाखल तारखेपासुन अर्जदार हिस दरमहा रक्कम रुपये १०,०००/– अंतरिम पोटगी मिळावी अशी विनंती अर्जदाराने केलेली आहे.

४. सामनेवाला नं. १ यांनी निशाणी २० खाली म्हणणे देवून विरोध केला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, अर्जदार लग्नानंतर जेमतेम २ महिने सासरी नांदली मात्र या काळात देखील ती व्यवस्थित व धडपणे वागली नाही. अर्जदार ही नेहमीच सामनेवाला याचेवर संशय घेत असे. सामनेवाला नं. १ याचा अर्जदार हिने घाणेरडे आरोप करुन प्रचंड मानसिक छळ करत. सामनेवाला नं. १ याची प्रथमपासुन अर्जदार हिस

नांदवण्याची प्रामाणिक इच्छा होती व आहे. अर्जदार हीने स्वतःहुन सामनेवाला नं. १ चा त्याग करुन माहेरी निघुन गेली आहे व प्रस्तुतची खोटी केस दाखल केली आहे. सामनेवाला कुटूंबिय हे अत्यंत गरीब असुन त्यांची आर्थिक आबळ आहे. सामनेवाला नं. १ याचे इलेक्ट्रीक शॉप नसुन त्यापासुन त्यास ३० ते ३५ हजार रुपये दरमहा मिळत नाहीत. सामनेवाली नं. २ ही वयस्कर असुन तिस १० ते १५ हजार रुपये पगार मिळत नाही. अर्जदार नमुद केल्याप्रमाणे शेती नाही व तेवढे उत्पन्नही मिळत नाही. याउलट अर्जदार ही डावरे हॉस्पीटल येथे काम करत असुन त्यापासुन तिला दरमहा ८ ते १० हजार रुपये पगार मिळतो. अशाप्रकारे अर्जदार ही स्वतःचा चरितार्थ चालवण्यास समर्थ आहे. सबब अर्जदाराचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती सामनेवाले यांनी केली आहे.

५. अर्ज आणि प्रकरणाचा अभिलेख पाहता उभयंतामधील नातेसंबध हे वादातीत नाहीत ही बाब समोर येते आहे. अर्जदाराचे कथनानुसार सामनेवाला नं. १ याची आर्थिक परिस्थिती अत्यंत चांगली असुन त्यांची एकत्र कुटूंबाची मौजे वडगाव पान, ता. संगमनेर, जि. अहमदनगर येथे ३ ते ४ एकर बागायत शेतजमिन आहे. त्यापासुन वर्षाकाठी रक्कम रुपये ४ ते ५ लाख रुपये मिळतात. तसेच सामनेवाला नं. १ याचे स्वतःचे श्री. स्वामी समर्थ इलेक्ट्रीक शॉप असुन त्यास ३० ते ३५ हजार रुपये दरमहा पगार मिळतो. याउलट सामनेवाला यांचे म्हणणे आहे की,

सामनेवाला कुटूंबिय हे अत्यंत गरीब असुन त्यांची आर्थिक आबळ आहे. सामनेवाला नं. १ याचे इलेक्ट्रीक शॉप नसुन त्यापासुन त्यास ३० ते ३५ हजार रुपये दरमहा मिळत नाहीत. सामनेवाली नं. २ ही वयस्कर असुन तिस १० ते १५ हजार रुपये पगार मिळत नाही. अर्जदार नमुद केल्याप्रमाणे शेती नाही व तेवढे उत्पन्नही मिळत नाही. अर्जदार हिने सामनेवाला यांस शेती असल्याबाबत व त्यापासुन त्यांना ४ ते ५ लाख रुपये मिळत असल्याबाबत कुठलाही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. तसेच सामनेवाला नं. १ याचे इलेक्ट्रीक शॉप असुन त्यापासुन त्यास ३० ते ३५ हजार रुपये दरमहा मिळत असल्याबाबत देखील देखील अर्जदाराने कुठलाही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

६. सामनेवाला यांचे म्हणणे पाहता अर्जदार आणि सामनेवाला क्र. १ यांचे नाते सिध्द होते आहे आणि अदयापही ते कायम आहे असे दिसुन येते. अर्जदार ही सामनेवाला क्र. १ पासुन वेगळी तिचे माहेरी आश्रयाने राहते आहे आणि तिचे जिवन कंठीत आहे. अर्जदार ही सामनेवालाकडून दरमहा रुपये १०,०००/– पोटगी मागणी करीत आहे मात्र अर्जदाराच्या तोंडी कथनाशिवाय इतर कोणताही पुरावा अर्जासोबत दाखल केलेला नाही. प्रस्तुत अर्ज निशाणी ५ चे स्वरुप पाहता तो अंतरिम पोटगीकरिता आहे. अर्जातील कथने पाहता अर्जदार ही सामनेवाला याची पत्नी आहे तो तिचा नैसर्गीक पालनकर्ता आहे. अशा परिस्थीतीत

सामनेवाला याने अर्जदार त्याची पत्नी या नात्याने अन्नवस्त्राची तरतुद करणे आवश्यक आहे.

७. अर्जदाराने सामनेवाला याचा त्याग स्वतःहुन केला किंवा नाही ही बाब योग्य त्या संपरिक्षेअंती सिध्द करावी लागणार आहे. तुर्तास प्रस्तुत अर्ज हा अंतरिम पोटगीकरिता आहे आणि या स्थितीला सामनेवाला याने अर्जदाराकरिता कोणतीही तरतुद केली असे म्हणणे नाही. सबब या बाबीचा विचार करुन अर्जाचा निकाल होईपावेतो अर्जदार हिस अंतरिम पोटगी देणे आवश्यक आहे. अर्जदार व सामनेवाला यांचे उत्पन्नाचे शपथपत्र पाहिले. सामनेवालाच्या उत्पन्नाचा तसेच जबाबदा-यांचा विचार करता तसेच त्याचा राहणीमानाचा दर्जा पाहता अर्जदार ही सामनेवालाकडून दरमहा रुपये १०,०००/- पोटगी मिळविण्यास पात्र नाही परंतु अर्जदार ही सामनेवालाकडून दरमहा रुपये ३,०००/- अंतरिम पोटगी देणे रास्त व उचित ठरेल. सबब मी प्रश्न क्रमांक १ चे उत्तर अंशतः होकारार्थी देत आहे.

**प्रश्न क्रमांक २ करिता**.

८. प्रश्न क्रमांक १ ची कारणमिमांसा आणि त्यांची आलेले निष्कर्ष पाहता, अर्जदार हे सामनेवालाकडून अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. सबब अर्जदाराचा अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# **आदेश**

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. सामनेवाला नं. १ यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी मुळ अर्जाचा निकाल होईपावेतो अर्जदार हीस दरमहा रक्कम रुपये ३,०००/– ( अक्षरी रक्कम रुपये तिन हजार मात्र ) प्रस्तुत अर्जाचे दाखल तारखेपासुन दयावेत.

३. अर्जाचा खर्च मुळ अर्जाच्या निकालावेळी गुणदोषावर ठरविण्यात येईल.

४. या आदेशाची प्रत अर्जदारास विनामुल्य देण्यात यावी.

आदेश खुल्या न्यायालयात निवेदीत करुन घोषित करण्यात आला.

RAHUL KESHAVRAO GAIKWAD

Digitally signed by RAHUL KESHAVRAO GAIKWAD
Date: 2024.04.06 17:26:31 +0530

दिनांक ०६.०४.२०२४
अकोले

( आर. के. गायकवाड )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
**अकोले**

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, या पी.डी.एफ फाईलमधील प्रत्येक शब्द हा मुळ आदेशाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | **श्री. सुनिल प्रल्हाद भाबड**<br>लघुलेखक (श्रेणी – ३) |
| न्यायालयाचे नाव | – | **श्री. राहुल के. गायकवाड**<br>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,<br>न्यायालय क्रमांक १, अकोले. |
| आदेश दिनांक | – | ०६/०४/२०२४ |
| न्यायदंडाधिकारी सही दिनांक | – | ०६/०४/२०२४ |
| आदेश अपलोड दिनांक | – | ०६/०४/२०२४ |